जनसंपर्क कक्ष
15 JUL 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खवलीत विद्यापीठाचे उपकेंद्र



**सातारा :** शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी खावली येथील निश्चित करण्यात आली आहे. जागेची पहाणी करण्यात आली असून, येत्या सहा महिन्यांत उपकेंद्राच्या बांधकामाचा प्रारंभ करण्यात येईल, अशी माहिती खासदार उदयनराजे भोसले यांनी दिली.

उदयनराजे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सातारा येथे होण्यासाठी आम्ही पहिल्यापासून आग्रही होतो. शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी असलेले अॅड. डी. जी. बनकर आणि अमित कुलकर्णी यांनी पाठपुरावा केला. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह विद्यापीठ अधिकाऱ्यांचे सहकार्य केले.' खासदार उदयनराजे भोसले यांनी बुधवारी जिल्हाधिकारी श्वेता सिंघल यांच्या कार्यालयात शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र उभारण्या बाबत संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. या वेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते. 'बैठकीत खावली येथील जागा निश्चित करण्यात आली आहे. सदरची जागा उपलब्ध करुन देण्यात कोणतीही अडचण नाही. ही जागा खासदार भोसले यांच्या सूचनेनुसार उपलब्ध करून दिली जाईल. त्या ठिकाणी सातारा जिल्हावासियांच्या सुविधेसाठी शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्यास येईल,' अशी माहिती सिंघल यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUL 2018
लोकमत

# विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी साताऱ्यात जागेची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** सातारा तालुक्यातील खावली गावाजवळ कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र होणार आहे. क्षेत्रमाहुली ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या या जागेबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेचा ठराव घेऊन शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. येथील सुमारे शंभर एकर जागेची पाहणीही बुधवारी करण्यात आली.

जिल्हाधिकारी श्वेता सिंघल यांच्या दालनात या कामाच्या अनुषंगाने बुधवारी बैठक पार पडली. यात उपकेंद्राच्या उभारणीबाबत सविस्तर चर्चा झाली. क्षेत्रमाहुली ग्रामपंचायतीच्या हद्दीत शासनाच्या मालकीची सुमारे ७१ हेक्टर जागा उपलब्ध आहे. यापैकी १०० एकर जागेची मागणी करण्यात आली आहे.

ही जागा उपलब्ध होण्यासाठी जिल्हा परिषदेचा ठराव होणे आवश्यक आहे. जागा मागणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले असून ठराव झाल्यानंतर हा प्रस्ताव शासनाकडे पाठविणार आहे.

या चर्चेनंतर खा. उदयनराजे भोसले, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अ‍ॅकॅडमिक अ‍ॅडव्हायझर डॉ. डी. आर. मोरे, आदींनी क्षेत्रमाहुली हद्दीतील उपकेंद्रासाठी प्रस्तावित केलेल्या जागेची पाहणी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUL 2018
Times of India

# SUK issues revised notification for PG diploma courses in economics

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has issued revised notification for around 8 post-graduate (PG) diploma courses in economics. The applications for these courses are to be submitted by July 21 as against earlier deadline of June 30.

The revised notification on July 2 stated that admission procedure for PG Diploma courses will be held in the department of economics of the SUK campus.

It added that application forms are available in the said department and duly filled forms with photograph and attested final year mark sheet should be submitted to the office on or before July 21.

The circular stated that there are 50 seats on the offering for each course that will start from July, depending on the admission procedure.

About the courses, the circular stated that globalisation is an opportunity for the students. One can take benefits of globalisation by upgrading their skills along with specialization with additional skills which are required in the job market.

"The courses conducted in the department of economics are tailor made to equip the students with additional add-on-knowledge of the subjects that have in demand in the job market," it added.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUL 2018
Times of India

# Varsities told to send info about sexual harassment cases

File Photo



The report needs to be submitted with the UGC by July 31

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked universities across the country to send information about the sexual harassment cases by July 31.

The commission has been the universities to consider the matter as top priority and provided cases registered in affiliated colleges as well.

In a circular, dated July 2, UGC secretary Rajnish Jain said the UGC in its previous letters to the vice-chancellors had requested to constitute an internal complaint committee (ICC) and a special cell in their respective institutions to deal with the issue of gender-based violence and to conduct gender sensitization programme.

"You are requested to ensure that the ICC constituted in your esteemed university is working as per UGC (Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment of Women employees and students in higher educational institutions) Regulations, 2015," he said.

In his letter, Jain asked the vice-chancellors to send the annual cases of sexual harassment reported between April 1, 2017 and March 31, 2018 along with the details of the ICC by July 31. He added that the said information will be compiled and furnished to the government of India.

The UGC, in the circular, has asked the university officials to take the matter as top priority and comply with the report at the earliest.

It should be noted that earlier in the year 2015, Centre for Women's Studies of the Shivaji University, Kolhapur (SUK) had submitted a memorandum on sensitisation of educational campuses on sexual exploitation and gender equality to Meena Chandawarkar, the then chairperson of the University Grants Commission's standing committee.

The university officials then had suggested that those universities who do not deal with sexual exploitation cases seriously and back the accused for their wrongdoings, should be penalised by holding back their all types of grants.

Notably, the UGC has been constantly asking all the universities coming under its jurisdiction to implement the women security measures on their campuses and the affiliated colleges.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JUL 2018
पुण्यनगरी

# प्राणिशास्त्र विभागातर्फे तामगाव येथे वृक्षारोपण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचे प्राणिशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी फौंडेशन, तामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने तामगाव, ता. करवीर येथे वृक्षारोपण करण्यात आले. सुमारे २०० वृक्षांचे रस्त्यांच्या दुतर्फा रोपण करण्यात अले. या झाडांची देखभाल ज्यांच्या दारात झाड आहे त्यांनी करण्याची जबाबदारी घेतल्याने झाडांचे संगोपन होऊन झाडे जगणार आहेत. यासाठी प्राणिशास्त्र अधिविभागातील एनएसएसचे विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय सेवक, फौंडेशनचे पदाधिकारी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. संतोष खोचगे आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.